# वाघाने फक्त मुंडकेच शिल्लक ठेवले

वाघाने फक्त मुंडकेच शिल्लक ठेवले | सरपण आणायला गेलेल्या मन्नू जावरकरची शिकार



## हरिसाल येथील घटना

**मारोती पाटणकर**

**चुरणी,( दि.4 )** – सरपण आणायला जंगलात गेलेल्या एका 60 वर्षीय इसमाची वाघाने शिकार करुन त्याचे फक्त मुंडके शिल्लक ठेवले. मन्नू बाबला जावरकर ( रा.हरिसाल) असे शिकार झालेल्या इसमाचे नाव आहे. मन्नू हा सोमवारी (दि.2) पासून घरुन सरपण आणायला गेला होता, तेव्हापासून तो बेपत्ता होता.

मन्नू जावरकर हा जंगलातून सरपणाची मोळी आणून हरिसालमध्ये विकायचा. यावरच त्याचा उदरनिर्वाह चालत असे अशी माहिती गावकऱ्यांनी दिली. आर्थिक परिस्थिती अतिशय हलाखीची असल्यामुळे पोटापाण्याची सोय लावण्याकरिता मन्नु नेहमीप्रमाणे सोमवारी दुपारी 2 वाजताच्या सुमारास जंगलामध्ये लाकडाची मोळी आणायला गेला होता. मात्र सायंकाळ झाली तरी तो घरी परतला नाही. दुसऱ्या दिवशी मंगळवारी नातेवाईकांची गावामध्ये शोध घेतला परंतु मन्नु कोठेच मिळून आला नाही

### 2 किलोमीटर आता मिळाले मुंडके

मन्नुचे कुटूंबिय व गावकरी त्याचा शोध घेतच होते. दरम्यान बुधवारी चौराकुंड मार्गावर शेवरीमुंडा परिसरात दोन किलोमीटर जंगलामध्ये मन्नू जावरकर याचे मुंडके आढळून आले. त्यानंतर आसपास पाहणी केली असता मृतदेहाचा इतर भाग पूर्णतः वाघाने खाल्ल्याचे आढळून आले. मन्नु च्या मुलाने या प्रकाराची माहिती वनविभाग व धारणी पोलिसांना दिली. त्यानंतर वनविभागाचे अधिकारी व पोलीस घटनास्थळी दाखल झाले. मन्नुच्या शरीराचे पूर्ण हाडे सुद्धा वाघाने फस्त केली. मुंडक्याच्या आजूबाजूला वाघाचे पगमार्क आढळल्याचे अधिकाऱ्यांनी बोलताना सांगितले.

### 10 हजार तातडीची मदत



मेळघाटचे आमदार केवलराम काळे यांनी जावरकर कुटुंबियांची भेट घेत वनविभागाकडून 10 हजार रुपयांची तातडीची मदत मिळवून दिली. आ.काळे यांनी यावेळी वाघाने पुन्हा हल्ला करु नये याकरिता उपाययोजना करण्याची चर्चा अधिकाऱ्यांसोबत केली. यावेळी एसीएफ मोगरे, आरएफओ दाईत व गावकरी उपस्थित होते.

हरीसाल पासून दोन किलोमीटर अंतरावर शौर्य कुंडरोड पासून दोन किलोमीटर आत मध्ये जंगलामध्ये मन्नू बाबला जावरकर वय 60 यांचे मृतदेह आढळले आले. घटनास्थळी जाऊन आम्ही पंचनामा केला आहे. त्याचे संपूर्ण शरीर वाघाने खाल्ले आहे. मृतदेहाच्या आजूबाजूला वाघाचे पगमार्क दिसून आलेत. फॉरेस्ट अधिकारी सुद्धा सोबत होते.

**अशोक जाधव,ठाणेदार धारणी.**

पोलीस आणि डॉक्टरांचा रिपोर्ट आल्यानंतर शासकीय नियमानुसार मृतकाच्या नातेवाईकांना मदत देण्यात येईल. नागरिकांनी जंगलाच्या जास्त आत मध्ये जाऊ नये. स्वतऱ्ची काळजी घ्यावी.

**–सुमंत सोळंके,**
**उपवनसंरक्षक वन्यजीव गुगामल, चिखलदरा.**

# वाघाच्या हल्ल्यात दोन वर्षात चार जणांचा बळी



**भरदिवसा तीन, एक रात्रीला शिकार**

**मेळघाटात पुन्हा पट्टेदार वाघाची दहशत**

**दिनेश सोनोने**

**धारणी, ( दि.4 )**– तालुक्यातील हरीसाल येथे मन्नू बाबला जावरकर (वय 60 रा.हरिसाल) याची वाघाने शिकार केल्याची धक्कादायक घटना समोर आली. मेळघाटातील वाघाच्या हल्ल्याची ही तीन महिन्यात दुसरी घटना असून गेल्या दोन वर्षात विविध घटनेमध्ये वाघाने चार लोकांना ठार केले आहे. या घटनेनंतर पुन्हा एकदा अवघ्या मेळघाटात पट्टेदार वाघाची दहशत पहायला मिळत आहे.

मेळघाट व्याघ्र प्रकल्प परिसरात गेल्या काही काळात वाघांचे कोअर परिसरातून वस्त्यांलगतच्या जंगलाकडे वाढते आगमन आणि हल्ल्यांची मालिका सुरू आहे. यातील तीन घटना भरदिवसा, तर एक रात्रीच्या वेळेस घडली असल्याने जंगलालगत राहणाऱ्या ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

वनविभाग आणि स्थानिक प्रशासनाने घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला आहे. मृतकाच्या कुटुंबीयांना तत्काळ आर्थिक मदतीची मागणी होत आहे. तसेच, वाघाला पकडण्यासाठी सापळा लावण्यात यावा, अशी ग्रामस्थांची मागणी आहे. सततच्या घटनांमुळे वाघ मानव संघर्षाची समस्या पुन्हा ऐरणीवर आली आहे. यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी आता जोर धरत आहे. वनविभागाने सतर्कता वाढवावी, संवेदनशील भागात गस्त वाढवावी व नागरिकांना सुरक्षित अंतर राखण्याच्या सूचना देण्यात याव्यात, अशी स्थानिकांची मागणी आहे.

### अश्या घडल्या घटना

- **12 जून 2023 :** मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील गुगामल वन्यजीव विभागातील माताकोल संरक्षण कॅम्पनजीक कारा येथे निस्ताराचे बांबू तोडण्यासाठी जंगलात गेलेल्या एका युवकावर वाघाने हल्ला केल्याची घटना सोमवार 12 जून रोजी दुपारी घडली होती. या युवकाला वाघाने फरफटत दरीत ओढून नेले होते. घटनास्थळी त्याचा मोबाईल, पॅन्ट, रक्ताचे शिंतोडे मिळाले होते. राजेश रतिराम कास्देकर (28, रा. कारा) असे त्या युवकाचे नाव होते.
- **3 नोव्हेंबर 2024 :** हरीसाल वन वर्तुळाअंतर्गतच केसरपूर येथील रहिवासी हरिराम धिकार नामक इसमावर रविवारी (दि.3) रोजी वाघाने हल्ला करुन त्याला ठार केले होते. हरिराम हा जंगलात लाकडे तोडण्यासाठी गेला होता. दरम्यान जंगलात दबा धरून बसलेल्या वाघाने एकाएकी त्याच्यावर हल्ला केला. यात हरिराम जागीच मृत्युमुखी पडला.
- **3 मार्च 2025 :** चिखलदरा तालुक्यातील जमली वन गावापासून काही अंतरावर रविवारी रात्री दुचाकीनं जाणाऱ्या युवकावर वाघानं हल्ला करून त्याला जंगलात एक किलोमीटर आतमध्ये ओढत नेऊन ठार मारल्याची घटना समोर आली. विनोद चिमटे (वय 26) असे मृत युवकाचे नाव होतो. विनोद खोंगडा येथून बाजारातून मासेविक्री करुन परत येत असताना ही घटना घडली होती.
- **4 जून 2025 :** धारणी तालुक्यातील हरीसाल येथे मन्नू बाबला जावरकर (वय 60 रा.हरिसाल) याची वाघाने शिकार केल्याची धक्कादायक घटना समोर आली. हा घटनेच्यावेळी लाकडी मोळी आणण्याकरिता जंगलात गेला होता.

# आयपीएलच्या अंतिम सामन्यावर सट्टा लावताना 6 सट्टेबाज अटकेत

## 3.89 लाखांचा मुद्देमाल जप्त; गुन्हे शाखेची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.4 )** – आयपीएलचा अंतिम सामना मंगळवारी पंजाब व बेंगळुरु संघांमध्ये खेळला गेला. याच सामन्यावर सट्टा लावत असलेल्या 6 सट्टेबाजांना गुन्हे शाखा युनिट वनने राजापेठ व गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतून अटक केली. आरोपींकडून 22 मोबाईल, 3 लॅपटॉप, व्हॉईस रेकॉर्डर, एलईडी टीव्ही, रोख रक्कम असा एकूण 3 लाख 89 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिस सुत्रानुसार, योगेश प्रमोद साबू (36, रा. छांगाणी नगर, अमरावती), तुषार दिलीप करवां (36, रा. न्यू गणेश कॉलनी, अमरावती), हर्षल हनुमानदास राठी (36, कोल्हटकर कॉलनी, अमरावती), दीपक शंकर गोस्वामी (37, लकडगंज, नागपूर), आकाश किसनराव इंगोले (32, अंजनगाव बारी, अमरावती) व अखिल हरीश त्रिकोटी (33, रामपुरी कॅम्प, सिंधी चौक, अमरावती) अशी आरोपींची नावे आहेत. राजापेठ येथील पाच आरोपींना 7 जूनपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे, तर गाडगेनगर पोलिस ठाण्यात अखिल त्रिकोटीविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. यातील पाच आरोपींना राजापेठ हद्दीत तर अखिल हरीश त्रिकोटी (33, रामपुरी कॅम्प, सिंधी चौक, अमरावती) याला गाडगेनगर हद्दीतून अटक करण्यात आली.

पोलिस आयुक्त अरविंद चावरिया यांच्या आदेशानुसार आयपीएल अंतिम सामन्याच्या पार्श्वभूमीवर गुन्हे शाखा युनिट वनच्या पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे छापे टाकले. ही कारवाई डीसीपी गणेश शिंदे, कल्पना बारवकर, सागर पाटील, एसीपी अरुण पाटील, एसीपी जयदत्त भंवर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव, सहायक पोलिस निरीक्षक मनीष वाकोडे, योगेश ईगळे, उपनिरीक्षक प्रकाश झोपाटे, पोलिस हवालदार सतीष देशमुख, फिरोज खान, सचिन बहाळे, प्रशांत मोहोड, अलीमउददीन खतीब, नाईक पोलीस अमंलदार नाझीमउददीन सैयद, विकास गुढधे, सचिन भोयर, पोलीस अमलदार सुरज चव्हाण, निखील गेडाम, रंजित गावंडे चालक अशोक खंगार, किशोर खेंगरे, सायबरचे निखिल माहुरे यांनी केलेली आहे.



### लॅपटॉप तपासणीत 240 सट्टा नोंदी आढळल्या

गुन्हे शाखेने जप्त केलेल्या लॅपटॉपमध्ये 240 सट्टा नोंदी असल्याचे उघड झाले आहे. 28 वेगवेगळ्या व्यक्तींनी या सट्टेबाजांकडे पैसे लावल्याची माहिती समोर आली असून सामना संपल्यानंतर आंगडियाद्वारे पैसे दिले जाणार होते, असेही निष्पन्न झाले आहे. या सट्टा प्रकरणात अजून अनेकांची नावे पुढे येण्याची शक्यता असून पोलिसांकडून आरोपींकडे कसून चौकशी सुरू आहे.

# गुन्हे शाखेच्या सर्तकतेने मिळाली चोरी गेलेली दुचाकी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.4 )** – दीड वर्षांपूर्वी पुसदा शिवारातून चोरीस गेलेली दुचाकी अखेर गुन्हे शाखेच्या सतर्कतेने शोधून काढण्यात बुधवारी यश आले आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीला अटक करून चोरी गेलेली दुचाकी जप्त करण्यात आली असून पोलीस दलाच्या कार्यक्षमतेचे कौतुक होत आहे.

1 ऑगस्ट 2022 रोजी सायंकाळी 5.30 च्या सुमारास रवि दिलीप शिंगणे (वय 25, रा. पुसदा, जि. अमरावती) यांनी त्यांची हीरो कंपनीची पॅशन प्रो दुचाकी क्रमांक एमएच 27 बीडी 2048 ही शेतशिवारासमोर उभी केली होती, आणि त्यानंतर ते शेतकामासाठी गेले होते. परत आल्यानंतर त्यांना दुचाकी गायब झाल्याचे लक्षात आले. त्यांनी आजूबाजूला शोध घेतला, मात्र दुचाकी मिळून आली नाही. या घटनेच्या तक्रारीवरून वलगाव पोलिस ठाण्यात अज्ञात चोराविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला होता. याप्रकरणात वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेने गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी फैजन खान अनवर खान (वय 24, रा. बिस्मिल्ला नगर, अमरावती) याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली असून, त्याच्याकडून दुचाकी जप्त करण्यात आली आहे.

# राजूरवाडी येथे विवाहित महिलेचा विजेचा शॉक लागून दुर्दैवी मृत्यू

- पाण्याची मोटर सुरु करताना झाला अपघात
- तीन वर्षांच्या चिमुकल्यावरून आईची छाया हरपली

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.4 )** – मोर्शी तालुक्यातील राजूरवाडी येथील एका 25 वर्षीय विवाहित महिलेचा पाण्याची मोटर सुरू करताना विजेचा जबरदस्त शॉक लागून मृत्यू झाल्याची ह्दयद्रावक घटना दि. 2 जून रोजी सकाळी 9 वाजता घडली.

प्रिया मिलिंद पारिसे (वय 25, रा. राजूरवाडी) ही जनार्धन भीमराव पचारे यांची कन्या असून, ती सकाळी घरात पिण्याचे पाणी भरण्यासाठी मोटर लावत असताना विजेचा शॉक लागून जागीच कोसळली. घटनास्थळीच तिचा मृत्यू झाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रिया हिने मेन पिन लावत असताना अचानक विजेचा धक्का बसला आणि हा दुर्दैवी अपघात घडला. प्रियाचे लग्न 2021 साली मिलिंद पारिसे यांच्यासोबत झाले होते. तिला आदित्य नावाचा तीन वर्षांचा मुलगा असून, ती मागील दोन वर्षांपासून माहेरी राहत होती. घटनेची माहिती मिळताच शिरखेड पोलीस स्टेशनचे बिट जमादार संतोष लहाने, मनोज कळसकर आणि रोशन कथे यांनी घटनास्थळी धाव घेऊन तपास सुरू केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालय, मोर्शी येथे पाठविण्यात आला. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शवविच्छेदन करून पार्थिव नातेवाईकांच्या ताब्यात दिले. प्रियाचा अंत्यविधी काल (दि. 2) रात्री उशिरा राजूरवाडी येथे तिचे पती व सासऱ्यांच्या उपस्थितीत पार पडला. घटनेमुळे संपूर्ण गावात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. पुढील तपास शिरखेड पोलीस स्टेशनचे ठाणेदार सचिन लुले यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# येरला गावाजवळ नाल्याच्या काठावर आढळला गळफास घेतलेला मृतदेह

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.4 )** – मोर्शी लगतच्या येरला गावाजवळ नाल्याच्या काठावर असलेल्या झाडाला एका सुमारे 55 वर्षीय अनोळखी पुरुषाचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आल्याने गावात खळबळ उडाली आहे. ही घटना आज, दिनांक 3 जून रोजी दुपारी साडेतीन वाजताच्या सुमारास उघडकीस आली.

मोर्शी पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या येरला गावाजवळील नाल्याच्या काठावर झाडावर गळफास घेतलेल्या अवस्थेत मृतदेह



असल्याची माहिती ग्रामस्थांनी पोलिसांना दिली. माहिती मिळताच पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी मृतदेह झाडावरून खाली उतरवून तपास सुरू केला. मृत इसमाच्या अंगात हिरवट रंगाची फुलबाही बनियन व निळसर रंगाची ट्रॅक पॅन्ट असल्याचे निदर्शनास आले आहे. मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नाही. सदर अनोळखी इसमाबाबत कोणालाही माहिती असल्यास मोर्शी पोलीस स्टेशनचे ठाणेदार नितीन देशमुख यांच्याशी मोबाईल क्रमांक 9923042565 वर तात्काळ संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, आत्महत्या की घातपात ? याचा शोध घेण्यासाठी पोलिस तपास सुरू असून, शवविच्छेदनासाठी मृतदेह मोर्शी येथील रुग्णालयात हलविण्यात आला आहे.

# चारचाकी वाहनातून मोबाइल लांबविला

**अमरावती** – चारचाकी वाहनातून मोबाइल लंपास करण्यात आल्याची घटना फ्रेजरपुरा ठाण्याच्या हद्दीतील महादेवखोरी येथे 3 जून रोजी घडली. गौतमनगर येथील रहिवासी शेषनाथ गजभिये (36) हे आपल्या वाहनाने घरी जात होते. तहान लागल्याने ते मार्गात थांबले. त्यानंतर ते पाणी प्यायला गेले. त्यावेळी त्यांनी आपला मोबाइल वाहनामध्ये ठेवला होता. त्याचवेळी त्यांना त्यांचे मित्र भेटले. त्यावेळी त्यांनी वाहनामध्ये बसून मित्रांसोबत गप्पा केल्या. दरम्यान, घरी गेल्यावर त्यांना वाहनामधील 10 हजार रुपये किमतीचा मोबाइल दिसून आला नाही. मोबाइल चोरी गेल्याचे लक्षात आल्यावर शेषनाथ गजभिये यांनी फ्रेजरपुरा ठाण्यात तक्रार दाखल केली.

# वाहतूक दंड वसुलीतून 3.55 कोटी ग्रामीण पोलिसांच्या तिजोरीत

## नागरिकांना ऑनलाईन भरणा करण्याचे आवाहन

***महासागर प्रतिनिधी***

***अमरावती,( दि.4 )*** – *वाहतूक नियमांचे उल्लंघन करूनही प्रलंबित ई-चालानचा भरणा न करणाऱ्या वाहनधारकांवर अमरावती ग्रामीण पोलिसांनी विशेष मोहीम राबवून कठोर पावले उचलली आहेत.*

1 जानेवारी ते 31 मेपर्यंतच्या या कालावधीत पोलिस विभागाने नागरिकांनी प्रलंबित दंड ऑनलाईन भरावे, या मोहिमेअंतर्गत घरपोच नोटीस पाठवत वाहनधारकांकडून प्रलंबित दंड वसूल केला. या मोहिमेदरम्यान अनपेड केसेसमधून 3 कोटी 60 लाख 60 हजार 100 रुपयांचा दंड तर नियमित केसेसमधून 95 लाख 18 हजार 400 रुपयांचा दंड असा एकूण 3 कोटी 55 लाख 78 हजार 500 रुपयांचा ई-चालान दंड शासनाच्या तिजोरीत जमा करण्यात आला आहे.



### 150 प्रकरणे न्यायप्रविष्ट

याशिवाय 150 प्रकरणे न्यायप्रविष्ट करण्यात आली असून, ज्यांनी अद्यापही दंड भरलेला नाही अशा वाहनधारकांवर न्यायालयाच्या परवानगीने वाहन जप्तीची कारवाई केली जाणार आहे. पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद यांनी सांगितले की, ही मोहीम 30 जूनपर्यंत सुरू राहणार आहे. त्यामुळे नागरिकांनी उद्भवणाऱ्या अडचणी टाळण्यासाठी त्यांच्या वाहनावरील प्रलंबित ई-चालान त्वरित भरावे आणि पोलीस प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. पोलिसांनी केलेल्या या व्यापक कारवाईमुळे जिल्ह्यात वाहतूक नियमांचे पालन अधिक कडकपणे सुनिश्चित होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

प्लाट विकणे आहे

प्लाट फक्त 6 लाख 51 हजार रुपये मध्ये

अमरावती पासून जवळच तेही फक्त 25 ते 30 मिनिटांच्या अंतरावर

संपर्क

7972805778

7620765180

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# अमरावती जिल्ह्यासाठी 1 कोटींचा ‘सौर ऊर्जा’ विकास निधी

## `मॉडेल सोलर व्हिलेज' योजनेअंतर्गत गावांना विकासाची सुवर्णसंधी



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 4)-** अमरावती जिल्ह्यातील पाच हजारांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावांना सौर ऊर्जेच्या माध्यमातून ऊर्जा-स्वावलंबन आणि पर्यावरणपूरक विकासाच्या दिशेने चालना देण्यासाठी केंद्र शासनाच्या पी.एम. सूर्यघर मुफ्त बिजली योजनेअंतर्गत ‘मॉडेल सोलर व्हिलेज' योजना राबविण्यात येत आहे. या स्पर्धात्मक योजनेसाठी पात्र गावांकडून 16 जूनपर्यंत प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

या योजनेअंतर्गत विजेत्या गावाला 1 कोटी रुपयांचा विशेष विकास निधी दिला जाणार आहे. यामधून गावात सौर ऊर्जा आधारित विविध प्रकल्प राबवता येणार असून, पर्यावरणपूरक आणि ऊर्जा कार्यक्षमतेच्या दृष्टीने हे एक महत्वाचे पाऊल ठरणार आहे.

### योजना अंतर्गत होणारे लाभ

- सौर ऊर्जा प्रकल्प व बॅटरी एनर्जी स्टोरेज सिस्टिम्सच्या माध्यमातून संपूर्ण गावासाठी स्वच्छ ऊर्जा.
- महिला बचतगटांना 90 टक्के आर्थिक सहाय्य - सौर-आधारित उपजीविका प्रकल्पांद्वारे महिलांचे सक्षमीकरण.
- शाळा, आरोग्य केंद्रे, शासकीय इमारती सौर ऊर्जेवर - विजेचा खर्च कमी, पर्यावरण संरक्षण.
- गावातील रस्ते सौर दिव्यांनी प्रकाशित - सुरक्षिततेत वाढ.
- शेतकऱ्यांसाठी सौरपंप - सिंचनासाठी डिझेलमुक्त पर्याय व खर्चात बचत.
- डेअरी, सहकारी संस्था, मत्स्योद्योग उपक्रमांना 90 टक्के आर्थिक मदत - ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी.

### संपर्क व माहिती

या योजनेसाठी इच्छुक गावांनी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा), विभागीय कार्यालय, अमरावती येथे संपर्क साधावा.

ईमेल :- domedaamravati@mahaurja.com

दूरध्वनी :- 0721-2661610 / 8669911011

हा निधी गावांसाठी आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करण्याची सुवर्णसंधी आहे, असे प्रतिपादन विभागीय महाव्यवस्थापक प्रफुल्ल तायडे यांनी केले आहे.

# अपघातग्रस्ताला वाचवणारे देवदूत ठरले धामणगांवकर!

## पत्रकार, 108 रुग्णवाहिका चालक व डॉक्टर यांच्या माणुसकीचे दर्शन



**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे, (दि.4)-** अमरावतीजवळील पोहरा रोडवरील भानखेड फाट्याजवळ सोमवारी रात्री आठच्या सुमारास दोन दुचाकींमध्ये झालेल्या अपघातात साईनगर येथील 50 वर्षीय संतोष शहारे हे गंभीर जखमी झाले. या अपघातात मलकापूरकडे जाणारे एक दाम्पत्य देखील सहभागी होते. अपघात झाल्यानंतर संतोष शहारे हे रस्त्यावर गंभीर अवस्थेत पडले होते, मात्र अंधार आणि भीतीमुळे आजूबाजूचे लोक मदतीसाठी पुढे आले नाहीत.

याच वेळी धामणगाव रेल्वे येथून अमरावतीकडे रिसेप्शनला जाणारे पत्रकार संतोष वाघमारे, पत्नी आणि मुलीसह त्या ठिकाणी पोहोचले. त्यांनी गर्दी पाहून गाडी थांबवली आणि अपघातस्थळी पडलेल्याची स्थिती पाहून तात्काळ मदतीसाठी पुढे धाव घेतली. त्यांच्या या संवेदनशील आणि धाडसी कृतीमुळे एक जीव वाचला. योगायोगाने त्याच क्षणी घटनास्थळी 108 रुग्णवाहिका आली. वाघमारे यांनी रुग्णवाहिका थांबवून चालक अंकुश डुमरे आणि डॉक्टर तेजस सोळंके यांना परिस्थिती समजावून सांगितली.

आधीच रुग्ण असतानाही या दोघांनीही अपघातग्रस्त शहारे यांना रुग्णवाहिकेत घेतले आणि अमरावतीतील ईर्विन रुग्णालयात दाखल केले. तातडीच्या उपचारामुळे त्यांचे प्राण वाचू शकले. रिसेप्शनला उशीर होत असूनही केवळ माणुसकीपोटी अज्ञात व्यक्तीची मदत करणाऱ्या वाघमारे यांचे, आणि कर्तव्यापेक्षा माणुसकीला प्राधान्य देणाऱ्या रुग्णवाहिका पथकाचे परिसरात मोठे कौतुक होत आहे. त्यांच्या संवेदनशीलतेमुळे आणि तत्परतेमुळे पुन्हा एकदा समाजात माणुसकी जिवंत आहे हे अधोरेखित झाले आहे.

# 2.40 लाखांचा कॅमेरा चोरी करणारा बालक ताब्यात

## 48 तासांत उघड | विधी संघर्षित बालकाकडून कॅमेरा जप्त

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 4)** फ्रेजरपुरा पोलीस स्टेशनच्या डीबी पथकाने उत्कृष्ट कौशल्य दाखवत कोणताही ठोस पुरावा नसतानाही अवघ्या 48 तासांत व्हिडिओ कॅमेरा चोरी प्रकरणाचा उलगडा केला. याप्रकरणात पोलिसांनी एका विधी संघर्षित बालकाला ताब्यात घेतले असून, त्याच्या राहत्या घरातून पॅनासोनिक कंपनीचा 2.40 लाख रुपये किमतीचा कॅमेरा जप्त करण्यात आला.

फोटोग्राफी करणारे प्रफुल ज्ञानेश्वर तायवाडे (वय 37 वर्षे, रा. संजय गांधी नगर, अमरावती) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ते 31 मे रोजी विजय राऊत यांच्या रिसेप्शन कार्यक्रमात महादेव खोरी येथे व्हिडिओ शूटिंग करत असताना त्यांनी आपला पॅनासोनिक कंपनीचा कॅमेरा स्टेजजवळ ठेवला होता. कार्यक्रम संपल्यानंतर रात्री 11.45 वाजता त्यांना कॅमेरा दिसला नाही. त्यानंतर त्यांच्या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणात

फ्रेजरपुरा पोलीसांनी घटनास्थळी जाऊन स्थानिकांकडून माहिती घेतली व हद्दीतील रेकॉर्डवरील आरोपींची चौकशी सुरू केली. तपासदरम्यान गोपनीय बातमीदाराकडून खात्रीलायक माहिती मिळाली की, एका विधी संघर्षित बालकाने कॅमेरा चोरून स्वतःच्या घरी लपवून ठेवला आहे. त्यानुसार पोलिसांनी तातडीने त्या बालकाच्या राहत्या घरी धाड टाकून चोरी गेलेला कॅमेरा जप्त केला. बालकाने पोलिसी चौकशीत गुन्ह्याची कबुली दिली. विशेष म्हणजे घटनास्थळी कोणताही प्रत्यक्ष पुरावा उपलब्ध नसताना केवळ गुप्त माहिती व कौशल्याच्या आधारे पोलिसांनी गुन्हा उघडकीस आणला. सदर कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त सागर पाटील, सहा. पोलीस आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. ही कारवाई फ्रेजरपुरा वरिष्ठ पोलीस निरीक्षक निलेश करे, गुन्हे निरीक्षक निलेश गावंडे, डीबी पथक प्रमुख पोलिस उपनिरीक्षक राहुल महाजन, पोलिस हवालदार योगेश श्रीवास, हरीश बुंदेले, शशिकांत गवई, हरीश चौधरी, जयेश परिवाले, रोशन वर्हाडे, चालक अमोल राठोड यांनी केली.

# विद्यार्थ्यांनी सादर केले अवाक करणारे मर्दानी खेळ

## शंभुशौर्य मर्दानी आखाड्याचे स्व-संरक्षण शिबिर | 80 विद्यार्थ्यांचे प्रभावी प्रात्यक्षिक सादरीकरण






**महासागर प्रतिनिधी**




**अमरावती, (दि.4) -** शंभुशौर्य मर्दानी आखाडा यांच्या वतीने दिनांक 15 मे ते 31 मे दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या मर्दानी खेळ व स्व-संरक्षण शिबिराचा समारोप सोहळा दिनांक 1 जून रोजी म.न.पा. 16 न.शाळा, अंबिका नगर मैदान, कंवर नगर, अमरावती येथे मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी शिबीरार्थी विद्यार्थ्यांनी मर्दानी खेळांचे प्रात्याक्षिक सादर केले, जे पाहून येथे आलेले सर्वजण अवाक झाले.

या समारोप प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून माजी राज्यमंत्री जगदीश गुप्ता, रा.स्व.संघाचे इंद्रायणी नगर संघचालक अविनाश पहुरकर, अंबिका नगर संघचालक अविनाश भोजापुरे, लेफ्टनंट कर्नल लक्ष्मण गाले (सेवानिवृत्त), तसेच शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त सर्वेश मेन यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूजनाने, शस्त्रपूजन व मशाल प्रज्वलनाने झाली. शिबिराचे प्रास्ताविक अथर्व पहाडे यांनी करताना पंधरा दिवसांच्या प्रशिक्षणाचा सविस्तर आढावा दिला. तलवार, दंडपट्टा, दांडयुद्ध, लाठीकाठी, कराटे, कुऱ्हाड, भाला व जळती बनेटी यासह विविध शस्त्रकलेचे 80 प्रशिक्षणार्थींनी प्रभावी सादरीकरण केले. शास्त्रप्रात्यक्षिकांच्या वेळी पराग छांगानी यांनी त्याबाबत माहिती दिली. गुप्ता यांनी शिबिराच्या आयोजनाचे कौतुक करून शस्त्र व शास्त्र यांचे समाजातील महत्त्व अधोरेखित केले. लेफ्ट. कर्नल गाले यांनी स्वसंरक्षणाच्या गरजेवर प्रकाश टाकत शिबिरातील सहभाग्यांचे व आयोजकांचे अभिनंदन केले. समारोपप्रसंगी लाइफ लेसन्स फाउंडेशन तर्फे अध्यक्ष ॲड. दादासाहेब हाडके यांच्या हस्ते शंभुशौर्य मर्दानी आखाडा टीमला समाजकार्याबद्दल प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश रहाटगावकर यांनी तर आभार प्रदर्शन संयोजक गौरव केने यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गौरव केने, अनुराधा पांडे, जयेश वाढाई, प्रगती सुदा, स्वराज ठाकरे, अथर्व पहाडे, भूषण खेडकर, सारिका यादव, अंजली चाफेकर, सृष्टी महाजन, पराग छांगानी यांसह अनेक सदस्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला अंबिका नगर परिसरातील नागरिक, पालकवर्ग तसेच अंबिका नगर गणेश मंदिर समितीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### गुरुकुलचा प्रभावी ठसा

# जेईई आणि सीईटी परीक्षेत विद्यार्थ्यांचे देदिप्यमान यश!

## आर्यन, सर्वम, गोपेश, अर्णव यांची जेईई ॲडव्हान्समध्ये घवघवीत कामगिरी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.4) -** शहरातील शिक्षण क्षेत्रात नाविन्यपूर्ण उपक्रमांनी ख्याती मिळवलेल्या गुरुकुल संस्थेने यंदाही जेईई व सीईटी परीक्षांमध्ये आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. यंदाच्या जेईई मेन परीक्षेत गुरुकुलच्या 7 विद्यार्थ्यांनी यश मिळवले असून, त्यातील 4 विद्यार्थ्यांनी जेईई ॲडव्हान्समध्ये उल्लेखनीय रँक मिळवून राष्ट्रीय स्तरावर आपली छाप पाडली आहे.

त्यात आर्यन पांडे याने 873 रँक मिळवून सर्वोत्तम गुणांसह आघाडी घेतली आहे. त्याचबरोबर सर्वम मुळे (2318), गोपेश इंगळे (5369) आणि अर्णव कावरे (9813) यांनीही घवघवीत यश संपादन केले आहे.

या यशामागे संस्थेचे संचालक आलोक ठाकूर यांचे वैयक्तिक मार्गदर्शन, वेळेचे काटेकोर नियोजन, अभ्यासाची रचना आणि परीक्षेपूर्वी सखोल विश्लेषण यांचा मोठा वाटा असल्याचे पालक व शिक्षणतज्ज्ञांचे म्हणणे आहे. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष परीक्षेसारखा सराव करून घेतल्याने आत्मविश्वास वाढला आणि त्याचा परीणाम निकालात स्पष्टपणे दिसून आला. गुरुकुलने केवळ जेईई नव्हे तर सीईटी परीक्षेतही उजवा निकाल साधला आहे. संस्थेच्या सरासरी निकालाच्या तुलनेत यंदाचे गुणविश्लेषण अधिक उच्च पातळीचे असल्याचे स्पष्ट होते.

आर्यन पांडे या यशस्वी विद्यार्थ्याने सांगितले की, वे एज्युकेशन इनिशिएटिव्हच्या टेस्ट सिरीजमुळे मला जास्तीत जास्त प्रश्नांचा सराव करता आला. त्यामुळे मी परीक्षेचा ताण अधिक सहजतेने पेलू शकलो आणि हे यश मिळवले. आलोक ठाकूर म्हणाले, विद्यार्थ्यांना फक्त पुस्तकी अभ्यास नव्हे, तर स्पर्धात्मक मानसिकता, अचूक रणनीती आणि प्रश्नांची सखोल समज देणे हाच आमचा उद्देश असतो. या उल्लेखनीय यशामुळे अमरावतीसारख्या शहरातही राष्ट्रीय स्तरावर विद्यार्थ्यांना उंच भरारी घेता येते, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. गुरुकुलचा अभ्यासपद्धतीवरील भर आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठीचा संकल्प येत्या काळात आणखी यशाची द्वारे खुली करणार यात शंका नाही.

# नेत्रदान जनजागृती कार्यक्रमात सहभागी व्हा!- आ. सुलभा खोडके

### 10 जून जागतिक नेत्रदान दिन



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.4) -** 10 जून रोजी होणाऱ्या जागतिक नेत्रदान दिन जनजागृती कार्यक्रमाची तयारी अमरावतीत जोरात सुरू आहे. विसरुनी सारे जाती-धर्म, करूया नेत्रदानाचे कर्म या संकल्पनेवर आधारित या उपक्रमासाठी विविध सामाजिक संस्था आणि धार्मिक संघटनांचा सहभाग निश्चित करण्यात आला आहे.या कार्यक्रमाचे अध्यक्षपद माजी महापौर चरणजित कौर उर्फ रिना नंदा यांच्याकडे आहे. या कार्यक्रमाचे विशेष निमंत्रण अमरावतीच्या आमदार सुलभा खोडके व आ. संजय खोडके यांना देण्यात आले. सर्वांनी नेत्रदान जनजागृती कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन आ.खोडके यांनी केले आहे. कार्यक्रमात मृत नेत्रदाते, अवयवदाते आणि देहदात्यांच्या कुटुंबीयांचा कृतज्ञता समारंभ, तसेच नेत्रदान नोंदणी शिबिर, जनजागृती पर सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. या वेळी समितीचे समन्वयक शरद कासट, राजेंद्र भंसाली, मनीष सावला, रामप्रकाश गिल्डा, तसेच मोनिका उमक, नयना दापूरकर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

> दृष्टीबाधितांसाठी हे सुंदर जग पाहता यावे म्हणून नेत्रदान करणे ही काळाची गरज आहे. हरिना फाउंडेशन व समितीचा हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे.
>
> **सुलभा खोडके, आमदार अमरावती.**

# उच्च रक्तदाब : ‘अचूक मोजा, नियंत्रण ठेवा आणि दीर्घायुषी रहा’!

## जागतिक उच्च रक्तदाब दिनानिमित्त आरोग्यविषयक जनजागृती



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.4) -** जागतिक उच्च रक्तदाब दिन 17 मे रोजी साजरा करण्यात आला. यानिमित्ताने दि. 16 जूनपर्यंत विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. जागतिक उच्च रक्तदाब दिनानिमित्त रक्तदाब अचूक मोजा, नियंत्रण ठेवा आणि दीर्घायुषी राहा असा संदेश देत नागरिकांना आरोग्याबाबत सजग राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. योग्य वेळी उपचार न झाल्यास हृदयविकार, स्ट्रोक, मूत्रपिंड निकामी होणे यांसारख्या गंभीर समस्या होऊ शकतात, असे वैद्यकीय तज्ज्ञांचे मत आहे.

जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, जगभरात 1.28 अब्जाहून अधिक प्रौढांना उच्च रक्तदाबाचा त्रास आहे, ज्यापैकी अनेकांना याची जाणीवही नाही. विशेषत: भारतामध्ये प्रत्येक तिसरा प्रौढ व्यक्ती उच्च रक्तदाबाने प्रभावित आहे. उच्च रक्तदाब हा अनेकदा मूक आजार म्हणून ओळखला जातो कारण याची सुरुवातीला लक्षणे दिसत नाहीत. त्यामुळे नियमित तपासणी, संतुलित आहार, नियमित व्यायाम, योग व ध्यान, आणि मर्यादित व्यसने यावर भर देणे अत्यंत गरजेचे आहे.

### जोखीम घटक कोणते ?


- आहारात अधिक मीठ, साखर, तळलेले पदार्थ
- शारीरिक हालचालींचा अभाव
- धूम्रपान, मद्यपान
- अनुवंशिकता (वंशपरंपरागत कारणे)

### उपचार व उपलब्ध सेवा

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत, सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये उच्च रक्तदाब तपासणी व औषधोपचार विनामूल्य उपलब्ध आहेत. 30 वर्षांवरील प्रत्येक नागरिकाने आपल्या रक्तदाबाची नियमित तपासणी करून त्याचे नियंत्रण ठेवावे, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक यांनी केले आहे.

# राजुरा बाजार येथील गुरांचा बाजार बंद, बकरी बाजार मात्र सुरू

### सभापती बबलू पावडे यांची माहिती



**महासागर प्रतिनिधी**

**वारुड,(दि.4) -** वरुड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अंतर्गत येणाऱ्या राजुरा उपबाजारात गुरुवार, दिनांक 5 जून 2025 रोजी भरणारा गुरांचा बाजार बंद ठेवण्यात येणार आहे. बकरी ईद सण 2025 राज्यभर साजरा होत असताना महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम 1995 (दि. 4 मार्च 2015) नुसार नियमांचे पालन करण्याचे आदेश महाराष्ट्र गो सेवा आयोग, पुणे यांनी पत्राद्वारे दिले आहेत. याच पार्श्वभूमीवर वरुड पोलीस स्टेशननेही अधिकृत पत्र देऊन त्या अंमलबजावणीची सूचना केली आहे. त्यानुसार ही अंमलबजावणी केली जात आहे.

या निर्णयाची माहिती कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नरेंद्र उर्फ बबलू पावडे, सभापती बाबाराव मांगुळकर, सर्व संचालक मंडळाने सचिव नंदकिशोर बोडखे यांचे मार्फत प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. या निर्णयामुळे सर्व शेतकरी, व्यापारी व जनावरांची खरेदी-विक्री करणाऱ्या घटकांनी गुरेढोरे विक्रीस आणू नयेत, असे स्पष्टपणे सूचित करण्यात आले आहे. यामागे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, हा मुख्य उद्देश असल्याचे स्पष्ट करण्यात आले. सभापती बबलू पावडे यांनी सांगितले की, 5 जून 2025 रोजी फक्त गुरांचा बाजार बंद असेल, मात्र बकरी बाजार सुरू राहील. त्यामुळे बकरी विक्री करणाऱ्यांनी गोंधळात न पडता आपली कामे पार पाडावीत, असेही आवाहन करण्यात आले. दरम्यान, पुढील गुरुवार, (दिनांक 12 जून 2025) रोजी राजुरा बाजारातील गुरांचा बाजार नेहमीप्रमाणे सुरू राहणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीने सर्व संबंधित घटकांनी सहकार्य करून नियमांचे पालन करावे, असे आवाहन केले असून, कोणत्याही गैरसमजाला बळी न पडता अधिकृत सूचनांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# येरड (बाजार) परिसरात एक महिन्यापासून चोरट्यांचा धुमाकूळ

- नागरिक त्रस्त, नागरिकांमध्ये भितीचे वातावरण
- चोरट्यांना पकडण्यासाठी पोलिसांसमोर तगडे आव्हान





**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे, (दि.4)-** चांदूर रेल्वे तालुक्यातील व तळेगाव दशासर पोलीस स्टेशन हद्दीत येर्णाया येरड (बाजार) परिसरात मागील एक महिन्यापासून चोरट्यांनी चांगलाच धुमाकूळ घातला आहे. येरड (बा.) परिसरातील येरड, खरबी मांडवगड, बेलोरा, मोगरा, एकलारा, चांदुरखेडा व सुलतानपूर येथील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिक त्रस्त झाले आहे.

प्राप्त माहितीनुसार, चोरटे हे रात्री 11 ते 12 च्या दरम्यान गावापासून काही अंतरावर येऊन राहतात आणि मध्यरात्री 1 ते 3 च्या दरम्यान घरच्यांना घरात डांबून ठेऊन चोरी करून निघून जातात. घरातील लोकांना सकाळी झोपेतून उठल्यानंतरच आपल्याकडे चोरी झाल्याचे माहीत पडते असे परिसरातील लोकांनी सांगितले. त्यामुळे येरड, खरबी (मां.), चांदूरखेडा, एकलारा व परिसरातील नागरिक रात्रभर घरातच जागीच राहत असून चौकाचौकात व आपल्या घराजवळच गस्त मांडून बसले असतात. सध्या पेरणीचे दिवस जवळ असल्याने शेतकरी व शेतमजूर यांना सकाळी उठून शेती मशागतीच्या कामाला शेतात जावे लागते. परंतु रात्री चोरट्यांचा धुमाकूळ असल्यामुळे त्यांना रात्रभर जागेच रहावे लागत असून त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर परिणाम दिसून येत आहे. मागील एक महिन्यात तळेगाव दशासर पोलीस स्टेशन हद्दीत येत असलेल्या येरड (बाजार) येथील आशिष देशमुख व सुलतानपूर येथील रवी हाडके यांच्या घरी 1 ते 3 च्या सुमारास घर फोडून धाडसी चोरी झाली आणि सोने व रोख रक्कम मिळून चोरट्यांनी लाखो रुपयांचा ऐवज लंपास केला. तसेच चोरट्यांनी पुन्हा येरड येथे घरात घुसण्याचा प्रयत्न केला होता. मात्र गावातील लोकांच्या सतर्कतेमुळे चोर तेथून पसार झाले. व त्यानंतर त्याच दिवशी रात्री मोगरा येथे एका घरी चोरीचा प्रयत्न केला परंतु त्यांचा तोही प्रयत्न असफल ठरल्याने बाहेर उभी असलेली दुचाकी चोरून नेली. या चोरींचा अजूनही तपास लागला नसून या चोरांचा छडा पोलीस विभाग कधी लावतील ? असा सूर परिसरातील नागरिकांमध्ये दिसून येत आहे. त्यामुळे आता चोरट्यांचा शोध घेणे पोलिसांपुढे तगडे आव्हान असून पोलिसांनी दररोज परिसरात पेट्रोलिंग करावे अशी मागणी नागरिकांतून होत आहे.



# विदेशी दारूची अवैध विक्री करताना एकाला अटक

### 12 हजारांची विदेशी दारू जप्त

### राजापेठ पोलिसांची कारवाई


**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.4) -** राजापेठ पोलिसांनी छापा टाकून अवैधरीत्या विदेशी दारू विक्री करणाऱ्या एका इसमाला रंगेहाथ पकडले. त्याच्याकडून सुमारे 11 हजार 940 रुपयांची विदेशी दारू जप्त करण्यात आली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक पुनित कुलट यांच्या आदेशानुसार 4 जून रोजी डीबीचे पोलीस कर्मचारी मनीष करपे हे इतर पोलीस कर्मचाऱ्यांसह राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंग करत असताना, गुप्त माहितीच्या आधारे समजले की राजापेठ उडाणपुलाजवळील गद्रे चौकात एक इसम अवैधरित्या दारू विक्री करत आहे. त्यानुसार पंचाच्या उपस्थितीत तत्काळ कारवाई करत, पोलिसांनी प्रज्वल गोविंद वर्मा (वय 26, रा. शिराळा, वलगाव, अमरावती) याला मौकेवरून अटक केली. त्याच्याकडून विविध कंपनीची 12 हजार रुपये किमतीची विदेशी दारू जप्त करण्यात आली आहे. ही कारवाई पोलिस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त गणेश शिंदे, सहाय्यक पोलिस आयुक्त अरुण पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पुनित कुलट, पोलीस उपनिरीक्षक मिलिंद हिवरे, मनीष करपे, पंकज खटे, विजय राऊत, रवि लिखितकर, सागर भजगवरे, अर्जुन कदम आदींनी संयुक्तरित्या ही कारवाई यशस्वीपणे केली. राजापेठ पोलिसांनी आरोपीविरोधात गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

# नराधम बापाचा स्वतःच्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार

### राजापेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.4) -** बाप-लेकीच्या नात्याला काळीमा फासणारी एक धक्कादायक घटना बुधवारी राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली आहे. अमरावती जिल्हा ग्रामिण परिसरातील एका ठाण्यात कार्यरत असणाऱ्या एका पोलिस कर्मचाऱ्याने स्वताऱ्च्या 15 वर्षीय मुलीशी जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवल्याची धक्कादायक घटना बुधवारी उघडकीस आली आहे. या घटनेची तक्रार पिडित मुलीने 4 जून रोजी राजापेठ पोलिस ठाण्यात नोंदविली असन, पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

प्राप्त माहितीनुसार, आरोपी ग्रामीण पोलिस दलात कार्यरत आहे. तो राजापेठ पोलिस ठाण्याच्या परिसरातील रहिवासी आहे. 24 वर्षीय पीडितेने तिच्या तक्रारीत म्हटले आहे की, ती 15 वर्षांची असताना आरोपी वडिलांनी तिच्याशी जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले. परंतु तिने हे कोणालाही सांगितले नाही. या घटनेमुळे पीडिता खूप खचली होती. परंतु बुधवारी, 4 जून रोजी आरोपी पोलिस वडिलांनी पुन्हा लैंगिक अत्याचाराचा प्रयत्न केला. याला विरोध करत पीडिता घरातून पळून गेली आणि दुपारी थेट राजापेठ पोलिस ठाण्यात गेली आणि या प्रकरणाची तक्रार केली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपी वडिलांना अटक केली आहे. राजापेठ पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक पुनीत कुलट यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

अल्पवयीन मुलीने आपल्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप वडिलांवर केला आहे. या प्रकरणात, पीडितेच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस पुढील तपास करीत आहेत.

**-पुनीत कुलट,**
**पोलिस निरीक्षक, राजापेठ पोलिस ठाणे**

या प्रकरणात, कार्यालयाचा अहवाल अद्याप येणे बाकी आहे. तो आल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल.

**-विशाल आनंद,**
**पोलिस अधीक्षक (ग्रामीण)**

# अमरावतीत कृषी योजनांसाठी 55,925 शेतकऱ्यांची निवड

### 10 दिवसांत कागदपत्रे सादर करण्याचे आवाहन

### 20 कोटींचे अनुदान वाटप अपेक्षित




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.4)-** अमरावती जिल्ह्यातील 55,925 शेतकऱ्यांची निवड कृषी विभागाच्या विविध योजनांसाठी 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्वावर करण्यात आली आहे. निवड झालेल्या शेतकऱ्यांची सुमारे 20 कोटी रुपयांची यादी महाडीबीटी पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात आली असून, लवकरच SMS द्वारे याची माहिती पाठवली जाणार आहे.

निवड झालेल्या शेतकऱ्यांनी 10 दिवसांत आवश्यक कागदपत्रे सादर करावीत, अन्यथा त्यांचा अर्ज रद्द केला जाईल. अर्जदारांनी https://mahadbt. maharashtra. gov.in या संकेतस्थळावर AGRISTACK आयडीच्या आधारे लॉगिन करून प्रोफाईल 100 टक्के पूर्ण करणे बंधनकारक आहे. अनुसूचित जाती-जमातीसाठी जातप्रमाणपत्र आणि अपंग लाभार्थ्यांसाठी अपंगत्वाचा दाखला आवश्यक आहे. अग्रीस्टॅग आयडी नसल्यास, नजीकच्या सीएससी केंद्रातून तो त्वरित तयार करावा, असे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे. या योजनांतर्गत मोठ्या संख्येने शेतकऱ्यांना लाभ मिळणार असून, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी ही माहिती दिली.

### या योजनांचा समावेश

- मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना (शेततळे)
- प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना (सूक्ष्म सिंचन)
- एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान
- कृषी यांत्रिकीकरण उप-अभियान
- भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना


# आसेगाव पूर्णा येथे एकाची आत्महत्या



**अमरावती -** आसेगाव पूर्णा येथील रहिवासी एकाने राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केली. ही घटना 3 जून रोजी उघडकीस आली. सुरेश नारायण गायकवाड (41, रा. भवानीनगर, आसेगाव पूर्णा) असे मृतकाचे नाव आहे. सुरेश यांनी राहत्या घरी गळफास लावला. ही बाब कुटुंबीयांच्या लक्षात आल्यावर आसेगाव पूर्णा पोलिसांना माहिती देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला व मृतदेहाला शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठविण्यात आले. या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# राजापेठ उड्डाणपुलावर मध्यरात्री भीषण अपघात

### दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.4)-** शहरातील राजापेठ उड्डाणपुलावर मंगळवारी मध्यरात्री घडलेल्या दोन चारचाकी वाहनांच्या भीषण अपघातात दोन जण जखमी झाले असून, त्यापैकी एकाची प्रकृती गंभीर असल्याचे सांगितले जात आहे. भरधाव वेगात असलेल्या दोन्ही वाहनांची समोरासमोर धडक झाली. अपघात एवढा जोरदार होता की, वाहनांचे समोरचे भाग अक्षरशः चकनाचुर झाला होता. या घटनेने परिसरात खळबळ उडाली. या घटनेच्या अनुषंगाने बुधवारी सायंकाळपर्यंत गुन्हा दाखल झालेला नव्हता.

राजापेठ उड्डाणपुलावर नेहमीपेक्षा वाहनांची वर्दळ असते, परंतू मध्यरात्रीनंतर वाहनाची वर्दळ कमी होते, असे असतानाही झालेला हा अपघात अनेकांसाठी आश्चर्यकारक ठरला आहे. घटनेची माहिती मिळताच राजापेठ पोलीस स्टेशनच्या उपनिरीक्षकांसह पोलिस कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अपघातात जखमी झालेल्या व्यक्तींना तातडीने रुग्णालयात हलविण्यात आले. अद्याप जखमींच्या नावांची व स्थितीची अधिकृत माहिती मिळालेली नाही. अपघातग्रस्त वाहने रस्त्यावर आडवी झाल्यामुळे वाहतूकीला काही वेळ अडथळा निर्माण झाला होता. पोलिसांनी क्रेनच्या सहाय्याने दोन्ही वाहने बाजूला करून रस्ता मोकळा केला. घटनास्थळी पंचनामा करण्यात आला असून अपघाताचे नेमके कारण तपासण्यात येत आहे. अपघातानंतर काही वेळातच घटनास्थळी नागरिकांची गर्दी झाली. बघ्यांमुळे पोलिसांना मदत कार्यात अडथळा निर्माण झाला. मात्र पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात ठेवत गर्दी हटवली. या प्रकरणी पुढील तपास राजापेठ पोलिस स्टेशनच्या पथकाकडून सुरू आहे.

# भूखंड खरेदीच्या व्यवहारात दहा लाखांने गंडविले

### दोन महिलांसह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.4)-** भूखंड खरेदीच्या व्यवहारात एका गृहस्थाची दहा लाख रुपयांनी फसवणूक करण्यात आली. ही घटना 3 जून रोजी गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली. या प्रकरणी फसवणूक झालेल्या गृहस्थाच्या तक्रारीवरून दोन महिलांसह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

केतन योगेशराव खारकर व दोन महिला तिघेही रा. लोहारा, यवतमाळ अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. शहरातील विद्युतनगर येथील रहिवासी सतीश जवाहरलाल कनोजिया (49) व आरोपी यांच्यात एका भूखंडाच्या खरेदी-विक्रीचा व्यवहार झाला होता. त्यानुसार सतीश कनोजिया यांनी 18 ऑक्टोबर 2023 रोजी 2 लाख रुपये व 2 डिसेंबर 2025 रोजी 8 लाख रुपये असे एकूण 10 लाख रुपये आरोपी केतन खारकर याच्या बँक खात्यात पाठविले. या काळात सदर मालमत्तेची नोटरीसुद्धा करण्यात आली. त्यानंतर खरेदी खत करण्यात येणार होते. त्यासाठी सतीश कनोजिया यांनी आरोपींना वारंवार मोबाइलवर कॉल केले. मात्र, त्यांनी खरेदी खत करण्यास टाळाटाळ चालविली. त्यानंतर आरोपींनी सतीश कनोजिया यांचे कॉल उचलणे बंद केले. आरोपींनी त्यांचा मोबाइल क्रमांकसुद्धा ब्लॉक केला. या प्रकरणात आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर सतीश कनोजिया यांनी गाडगेनगर ठाण्यात तक्रार दाखल केली.

# कृषि निविष्ठांमध्ये लिंकींग झाल्यास सक्त कारवाई करा!

### जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचे निर्देश

### खरीपपूर्व आढावा बैठक



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती (दि. 4) -** येत्या खरीप हंगामात शेतकऱ्यांची कृषि निविष्ठांमध्ये लिंकींगच्या माध्यमातून पिळवणूक होऊ नये, यासाठी राज्य सरकारच्या निर्देशानुसार जिल्हा प्रशासनाने कडक भूमिका घेतली आहे. स्थानिक विक्रेत्यांच्या पातळीवर लिंकींग आढळल्यास कृषि विभागाने तत्काळ व सक्त कारवाई करावी, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कृषि विभागाच्या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी येरेकर बोलत होते. यावेळी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी राहुल सातपुते, आत्मा प्रकल्प संचालक अर्चना निस्ताने, जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, खरीप हंगामाच्या प्रारंभी बियाण्यांचा तुटवडा भासू नये याची विशेष काळजी घ्यावी. शेतकऱ्यांचा विशिष्ट वाणावर भर असल्याने तुटवडा निर्माण होऊ शकतो. त्यामुळे कंपन्यांशी समन्वय साधून पर्यायी वाणांची उपलब्धता सुनिश्चित करावी. सोयाबीन व कापूस पिकांची लागवड अधिक असल्याने त्यासाठी आवश्यक बियाण्यांच्या पुरवठ्यावर भर द्यावा.बाजारात विक्रीसाठी ठेवण्यात येणाऱ्या बियाण्यांची उगम क्षमता तपासावी, तसेच कोणत्याही परिस्थितीत बोगस किंवा प्रतिबंधित बियाण्यांची विक्री होणार नाही, याची दक्षता घ्यावी. खतांची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठीही प्रयत्नशील राहावे. अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मवर्षानिमित्त कृषि विभागाने सुशासन, महिला सक्षमीकरण आणि जलसंधारण क्षेत्रात योगदान द्यावे, असे आवाहनही जिल्हाधिकाऱ्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना केले.

### शेतकऱ्यांसाठी योजनांची प्रभावी अंमलबजावणी

शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी गोपीनाथ मुंडे सानुग्रह योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, पिक विमा योजना, आपत्कालीन मदत अशा विविध योजना प्रभावीपणे राबवाव्यात. या योजनांचा लाभ घेण्यासाठी ॲग्रीस्टॅक प्रणालीअंतर्गत शेतकऱ्यांची नोंदणी गरजेची आहे. ग्रामस्तरावर शिबिरे घेऊन नोंदणी गतीने पूर्ण करावी, तसेच अडचणींचे निराकरण करावे.

### कर्ज मंजूरीसाठी 'सीबिल स्कोअर' वर अवलंबून राहू नका

येरेकर यांनी अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना कर्जवाटप वाढवण्याचे निर्देश दिले. 78 टक्के रकमेचे कर्जवाटप झालेले असले तरी लाभार्थी शेतकऱ्यांची संख्या वाढवणे आवश्यक आहे. कर्जाची परतफेड 31 मार्चपूर्वी करण्याची अट लक्षात घेऊन, जुन्या कर्जाची परतफेड करून नव्याने कर्ज वाटप करण्यात यावे. कर्ज मंजुरीसाठी 'सीबिल स्कोअर' वर अवलंबून न राहता तक्रारी आल्यास कठोर कारवाईचे निर्देशही त्यांनी दिले.

# बनावट एचटीबीटी बियाणे प्रकरणाचे धागेदोरे गुजरातमध्ये

### अहमदाबादहून आणलेले 25 लाखांचे अनधिकृत बियाणे जप्त

### मुख्य सूत्रधाराचा शोध सुरू

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.4) -** शहरातील वेलकम पॉइंटवर दोन दिवसांपूर्वी पकडण्यात आलेल्या 25 लाख रुपयांच्या अनधिकृत एचटीबीटी बियाणे प्रकरणाचा तपास आता गुजरातपर्यंत पोहोचला आहे. गाडगेनगर पोलिस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, या प्रकरणाच्या मुळाशी जाण्यासाठी तपास पथक गुजरातला रवाना होणार आहे.

कृषी विभागाने अहमदाबादहून नागपूरला जाणाऱ्या वाहनातून तब्बल 2,500 पॅकेट्स अनधिकृत बियाणे पकडले होते. याप्रकरणी आता पोलिसही सक्रीय झाले असून, प्रमुख पुरवठादार कोण, त्यांचे संपर्क कसे आहेत याचा सखोल तपास करण्यात येणार आहे. जिल्ह्यात कृषी विभागाने आतापर्यंत सात कारवाया केल्या असून, त्यापैकी सहा प्रकरणांत गुजरातमधूनच बियाण्यांचा पुरवठा झाल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे अहमदाबादसह गुजरातमधील इतर शहरांवर संशयाची सुई वळली आहे. गुन्हेगारी व कृषी संबंधित अशा गंभीर प्रकरणात तपासकर्मींची तत्परता आणि विविध राज्यांमधील साखळी उघड करण्यासाठी चाललेली पावले अत्यंत महत्त्वाची आहेत.

एचटीबीटी बियाण्याच्या गैरव्यवहाराचा आम्ही सखोल तपास करणार आहोत. यामागील मुख्य सूत्रधार कोण आहे, हे शोधणे आवश्यक आहे, असे स्पष्ट करत पोलिस उपायुक्त सागर पाटील यांनी या कारवाईचे गांभीर्य अधोरेखित केले.

**-सागर पाटील, पोलीस उपायुक्त**

तपासासाठी आम्ही गुजरातला जाणार आहोत. त्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची परवानगी मागितली आहे. लवकरच पथक रवाना होईल. यामुळे लवकरच मुख्य सूत्रधार गजाआड जाईल, अशी शक्यता आहे.

**दिनेश दहातोंडे, प्रभारी ठाणेदार गाडगे नगर पो.स्टे.**

